जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
तरुण भारत
15 DEC 2025

# वसंतराव चौगले इंग्लिश स्कूल 'यसबा' चे मानकरी

## शिवाजी विद्यापीठ आणि यशवंत भालकर स्मृती फौंडशनतर्फे आंतरशालेय कला महोत्सव उत्साहात

तरुण भारत संवाद
विद्यापीठातून

**शिवाजी विद्यापीठात शनिवारी झालेल्या यसबा करंडक स्पर्धेत येथील वसंतराव चौगले इंग्लिश स्कूलने विजेतेपद पटकावले.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूर भूषण दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या ७ व्या स्मृतिदिनानिमित यसबा करंडक आंतरशालेय कला महोत्सव विद्यार्थी विकास विभाग, शिवाजी विद्यापीठ व चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर फौंडशेन यांचा संयुक्त विद्यमाने शिवाजी प्रांगणात हा कला महोत्सव पार पडला.

या महोत्सवात निबंध, मातीकाम, चित्रकला, रांगोळी, एकपात्री अभिनय, समूहगीत व समूह नृत्य अशा विविध कला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १६ शाळांनी सहभाग नोंदवला. सुमारे ३४० विद्यार्थी कलाकारांनी कलाविष्कारातून प्रेक्षकांची दाद मिळवली.



कोल्हापूर : येथे यसबा करंडक स्पर्धेत वसंतराव चौगले इंग्लिश स्कूलने पारंपारिक नृत्याचा अविष्कार सादर केला.

कला महोत्सवाचे अध्यक्षस्थान विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा. टी. एम. चौगुले यांनी भूषवले. महोत्सवाचे उद्घाटन उद्योजक संग्राम पाटील यांच्या हस्ते झाले.

यावेळी जयकुमार परिख, आर. बी. गुरव, प्रा. कपिल राजहंस, हेमांग सोमानी यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्पर्धामधून विद्यार्थ्यांमधील कला, सर्जनशीलता व आत्मविश्वासाचे दर्शन घडले. विविध कलाविष्कारांची उधळण होत महोत्सव रंगतदार ठरला. दुपारच्या सत्रात यसबा बाल मित्र पुरस्कार वितरण सोहळा झाला.

शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते प्रा. प्रज्ञा गिरी आणि आशिष घेवडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

ते म्हणाले, लहान मुलांसाठी विद्यापीठाच्या प्रांगणात अशा प्रकारचा कला महोत्सव होणे म्हणजे सांस्कृतिक चळवळीचे बीज रोवण्यासारखे असून भविष्यातील कलावंत घडविण्यास यामुळे बळ मिळेल, असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले.

या कला महोत्सवात यसबा करंडक विजेतेपद वसंतराव चौगुले इंग्लिश स्कूलने पटकावले, तर विमला गोयंका इंग्लिश स्कूलने उपविजेतेपद मिळवले. या उपक्रमासाठी पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र शासन (कोल्हापूर) यांचे विशेष सहकार्य लाभले.

स्पर्धांचे परीक्षण रेश्मा चिले, अंजली पाटील, नंदू जुवेकर, संजय तोडकर, डॉ. किशु पॉल, कार्तिक पॉल, सुचित्रा मर्डेकर, राजेंद्र मिस्त्री, बबन माने, सुधीर जोशी आणि शिल्पकार सत्यजित निगवेकर यांनी केले.

राजमाता जिजाऊ सभागृह, शिवाजी विद्यापीठ येथे झालेल्या या महोत्सवाला फौंडेशनचे अध्यक्ष संदीप भालकर, उपाध्यक्ष सपना जाधव, समन्वयक शिवम गेजगे, आकाश लिगाडे, रमा कुलकर्णी, सुधीर डेंगरे, प्रविण काटकर, सपना चव्हाण व मैथिली सरनाईक यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

1 5 DEC 2025

पुण्यनगरी



# चौगुले इंग्लिश स्कूल यसबा करंडकचा मानकरी

**कोल्हापूर :** यसबा करंडकचे विजेतेपद वसंतराव चौगुले इंग्लिश स्कूल यांना, तर विमला गोयंका इंग्लिश स्कूल यांना उपविजेतेपद मिळाले. कोल्हापूर भूषण दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या सातव्या स्मृतिदिनानिमित्त यसबा करंडक आंतरशालेय कला महोत्सव विद्यार्थी विकास विभाग, शिवाजी विद्यापीठ आणि चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर फाऊंडेशन यांचा संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात कला महोत्सव झाला.

निबंध, मातीकाम, चित्रकला, रांगोळी, एकपात्री, समूहगीत, समूहनृत्य अशा स्पर्धांत १६ शाळांनी नावनोंदणी केली असून, ३४० विद्यार्थी कलाकार यात सहभागी झाले होते. कला महोत्सवाच्या अध्यक्षस्थानी विद्यार्थी विकास विभागाचे प्र. संचालक टी. एम. चौगुले होते. महोत्सवद्या उद्‌घाटनप्रसंगी उद्योजक संग्राम पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

दुपारच्या सत्रात यसबा बालमित्र पुरस्कार वितरण सोहळा झाला. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते प्रा. प्रज्ञा गिरी, आशीष घेवडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. विशेष सहकार्य पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचनालय अर्चना पाटील यांचे लाभले. परीक्षक म्हणून रेश्मा चिले, अंजली पाटील, नंदू जुवेकर, संजय तोडकर, डॉ. किशू पॉल, कार्तिक पॉल, सुचित्रा मर्ढेकर, राजेंद्र मिस्त्री, बबन माने, सुधीर जोशी, सत्यजित निगवेकर होते. यावेळी फाऊंडेशनचे अध्यक्ष संदीप भालकर, उपाध्यक्ष सपना जाधव, समन्वयक शिवम गेजगे, आकाश लिगाडे, रमा कुलकर्णी, सुधीर डेंगरे, प्रवीण काटकर, सपना चव्हाण, मैथिली सरनाईक आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
15 DEC 2025
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यसबा करंडकचे मानकरी वसंतराव चौगुले इंग्लिश स्कूल

**● भूषण दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या सातव्या स्मृतीदिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन**



कोल्हापूर : यसबा करंडक विजेत्यांचा बक्षीस देऊन सन्मान करताना मान्यवर.

**जनप्रवास : कोल्हापूर**

भूषण दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या ७ व्या स्मृतीदिनानिमित्त यसबा करंडक आंतरशालेय कला महोत्सव, शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग व चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठात कला महोत्सव पार पडला. या स्पर्धेतील यसबा करंडक विजेतेपद वसंतराव चौगुले इंग्लिश स्कूलने पटकावले.

यसबा करंडक स्पर्धेतील निबंध, मातीकाम, चित्रकला, रांगोळी, एकपात्री, समूह गीत, समूह नृत्यात १६ शाळांमधील ३४० विद्यार्थी कलाकारांनी सहभाग नोंदवला. कला महोत्सवाच्या अध्यक्षस्थानी विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. तानाजी चौगुले होते. महोत्सवाचे उद्घाटन उद्योजक संग्राम पाटील, जयकुमार परिख, आर. बी. गुरव, प्रा. कपिल राजहंस, हेमांग सोमानी यांच्या हस्ते झाले. चित्रकला, मातीकाम, रांगोळी, निबंध, एकपात्री, समूह नृत्य, समूह गायन यातून मुलांमधील असलेली कलेविषयीची ओढ दिसून आली. दुपारच्या सत्रात प्रा. प्रज्ञा गिरी आणि आशिष घेवडे यांना यसबा बाल मित्र पुरस्कार कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते प्रदान केला.

यसबा करंडक विजेतेपद वसंतराव चौगुले इंग्लिश स्कूल तर विमला गोयंका इंग्लिश स्कूल यांनी उपविजेतेपद मिळाले. महाराष्ट्र शासन पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचनालयाच्या अर्चना पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. परीक्षक म्हणून रेश्मा चिले, अंजली पाटील, नंदू जुवेकर, संजय तोडकर, डॉ. किशु पॉल, कार्तिक पॉल, सुचित्रा मर्ढेकर, राजेंद्र मिस्त्री,बबन माने, सुधीर जोशी, सत्यजित निगवेकर यांनी पाहिले. यावेळी फौंडेशनचे अध्यक्ष संदिप भालकर, उपाध्यक्ष सपना जाधव, समन्वयक शिवम गेजगे,आकाश लिगाडे,रमा कुलकर्णी, सुधीर डेंगरे, प्रविण काटकर,सपना चव्हाण मैथिली सरनाईक उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 5 DEC 2025
तरुण भारत

# संशोधनाला उद्योगाची जोड देण्याची गरज

## ■ ॲल्युमिनियम मॅन भरत गीते

**कोल्हापूर :** केवळ प्रयोगशाळेतील चार भिंतींच्या आत संशोधन करून थांबणे आता उपयोगाचे नसून त्या संशोधनाचे रूपांतर प्रत्यक्ष उत्पादनात आणि व्यापारात झाले पाहिजे. देशाला खऱ्या अर्थाने स्वावलंबी आणि विकसित बनवण्यासाठी 'अॅकॅडेमिया आणि इंडस्ट्री' यांच्यात थेट संवाद होणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या तरुल इंडिया प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक आणि भारताचे 'ॲल्युमिनियम मॅन' म्हणून ओळखले जाणारे भरत गीते यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागामार्फत आयोजित तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदः फिजिक्स ऑफ मटेरियल्स अँड मटेरियल्स बेस्ड डिव्हाइस फॅब्रिकेशन परिषदेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रा. राजेंद्र सोनकवडे होते.

सकाळच्या सत्रात दक्षिण अमेरिकेतील चिली येथील डॉ. संतोष नंदी यांनी नॅनो स्ट्रक्चर्समधील अद्ययावत बदलांची माहिती दिली. अध्यक्षस्थानी डॉ. मानसिंग टाकळे होते. समन्वयक डॉ. नीलेश तरवाळ यांनी तीन दिवसांच्या कामकाजाचा आढावा सादर केला. डॉ. सत्यजित पाटील यांनी आभार मानले. परिषदेच्या यशस्वितेसाठी खजिनदार डॉ. राजीव व्हटकर, सचिव डॉ. आण्णासाहेब मोहोळकर, डॉ. केशव राजपुरे, डॉ. मानसिंग टाकळे, डॉ. एस. पी. दास, डॉ. एम. आर. वाईकर, डॉ. ए. आर. पाटील यांच्यासह सर्व कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

